# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 211/2022 दिनांक :24.05.2022

# 1)खुनः—

**मुक्रमाबाद :—**दिनांक 11.05.2022 रोजी 12.00 वा. ते दिनांक 15.05.2022 रोजी 08.30 वा. दरम्यान, **खाजामिया पिंजारी यांचे शेतातील आखाडयावर मौजे सावरमाळ शिवार ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे **मयत नामे इंदर ऊर्फ प्रेमला बापूराव भेंडेगावकर वय 30 वर्षे, रा. बेटमोगरा ता. मुखेड जि. नांदेड,** ही बेटमोगरा येथुन तिच्या आईच्या घरुन देगलूर ला जाऊन येते असे म्हणुन गेली असता ती घरी परत आली नाही तिचा नमुद ठिकाणी कोणीतरी अज्ञात ईसमाने अज्ञात कारणासाठी डोक्यात दगड घालून खुन केला. वगैरे **फिर्यादी चंदरबाई रावसाहेब भद्रे, वय 52 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. बेटमोगरा ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रमाबाद** गुरन 120/2022 कलम 302 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांगणे, मो.नं. 7385916468** हे करीत आहेत.

# 2)जबरी चोरी :—

**बिलोली :—**दिनांक 22.05.2022 रोजी चे 21.30 वा. ते 22.00 वा. चे दरम्यान, **बिलोली ते बाभुळगाव रोडवर ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे मुळ गाव हजापुर येथुन मोटार सायकलने बिलोली येथे येत असताना बावलगाव जाणारे रोडवर दोन अज्ञात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस हात दाखवुन मो.सा. थांबण्यास सांगितले व लगेच फिर्यादीस मारहाण करुन मो.सा. वर बसवून मारहाण करीत बावलगाव रोडवर 1 कि.मी. अंतरावर येवून फिर्यादीची हिरो कंपनीची पॅशन मो.सा. क्रं. एम.एच. 26/7935 किमत अंदाजे 30,000/— रुपयाची व नगदी 4000/— रुपये तसेच रेडमी कंपनीचा मोबाईल किंमत अंदाजे 3000/— असा एकुण 37,000/— रुपयाचा माल जबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी दत्तात्रय मारुती चंदनकर वय 28 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. गांधीनगर ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 116/2022 कलम 392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोनि/श्री डोईफोडे, मो.क्रं. 9823889037** हे करीत आहेत.

# 3)घरफोडी :—

**भोकर :—** दिनांक 13.05.2022 रोजी चे 20.00 ते दिनांक 22.05.2022 रोजी 08.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीच्या राहत्या घरी डौर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे राहते घराचे बंद दाराचे कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करुन सोन्याचे दागीने व साडया असा एकुण 96,900/— रुपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी गजानन शशिकांत विजापुरे वय 25 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. डौर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 179/2022 कलम 454,457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2058 कदम, मो.क्र. 9049320582** हे करीत आहेत.

# 4)मोबाईल चोरी :—

**1)कंधार :—**दिनांक 23.05.2022 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **आठवडी बाजार कंधार जिल्हा परिषद मैदान कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा आठवडी बाजार कंधार येथे बाजार करीत असाताना खिशातील वनप्लस नोर्ड कंपनीचा मोबाईल किंमती 15,000/— रुपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी चंद्रकांत शिवाजी केंद्रे, वय 25 वर्षे, व्यवसाय शेती रा. शेल्लाळी ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 157/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री गणाचार्य, मो.क्र. 9823311570** हे करीत आहेत.

**2)इतवारा :—**दिनांक 23.05.2022 रोजी चे 11.30 वा. चे सुमारास, **नवजीवन परमिट रुम ॲड बार जुनामोंढा, नांदेड येथे,** यातील फिर्यादी चा कॉउंटरवर ठेवलेला रेडमी नोट 10 कंपनीचा अक्वा ग्रिन कलरचा मोबाईल किंमती 10,000/— रुपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी रमेश किमतराय निहालानी, वय 68 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. सिंध्दी कॉलनी बाफना, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 115/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/1218 मठपती, मो.क्र. 9420914042** हे करीत आहेत.

## 6)फसवणुक :—

**1)भाग्यनगर :—** दिनांक 11.12.2020 रोजी ते दिनांक 22.01.2022, दिनांक 08.06.2021 रोजी दरम्यान, **दुय्यम निबंधक कार्यालय श्रेणी 2 नांदेड येथे,** यातील नमुद दहा आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीचे पत्नीचे नावे असलेला प्लॉट लता एकनाथ बडगुजर मयत असताना त्यांच्या जागी बनावट स्त्री उभी करुन बनावट विक्रीखत मृत्यु प्रमाणपत्र, आधार, व कागदपत्र बनावट बनवुन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी एकनाथ वसंतराव बडगुजर, वय 65 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त रा. धुळे ता. जि. धुळे** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 182/2022 कलम 420,464,467, 468,471,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जाधव, मो.नं. 9823603909** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 22.02.2022 रोजी 20.30 वा. चे सुमारास, **काळेश्वर मंदीर ते काळेश्वर कमान विष्णुपुरी नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस त्याचे मुलाचे लग्न लावून देतो म्हणुन लग्नासाठी 1,50,000/— रुपये व मुलीच्या गळयातील घातलेले सोन्याचे मंगळसुत्र किंमती 12,000/— रुपयाचे घेवुन फिर्यादीचे मुलासोबत लग्न न लावता फिर्यादीची फसवणुक करुन पळुन गेले. वगैरे **फिर्यादी आत्माराम बळवंत मालवीय, वय 50 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. झुग्गी झोपडी महिरपुर उज्जैन मध्यप्रदेश** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 303/2022 कलम 420,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कोरे, मो.नं. 8888836607** हे करीत आहेत.

## 7)विवाहीतेचा छळ :—

**1)रामतीर्थ :—** दिनांक 14.05.2022 ते आज पावेतो, **फिर्यादीचे सासरी मंडलापुर ता. मुखेड जि. नांदेड ह.मु. कुंचेली ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाईस यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करुन नौकरीसाठी माहेरहुन दहा लाख रुपये घेवून ये म्हणुन व तु दिसायला सुंदर नाहीस तुला स्वयंपाक करता येत नाही या कारणावरुन उपाशी पोटी ठेवून तीचा शारिरीक व माणसीक छळ करुन मारहाण केली. शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 28 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरनं 80/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2062 कोरके , मो.क्रं. 9421296127** हे करीत आहेत.

**2)लिंबगाव :—** दिनांक 31.03.2022 रात्री 20.00 वा., **फिर्यादीचे राहते घरी डोंगरगाव ता. कळमनुरी जि. हिंगोली ह.मु. बोरगाव तेलंग ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाईस यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करुन हुंडयातील उरलेले 60,000/— रुपये घेवून ये म्हणुन तीचा शारिरीक व माणसीक छळ करुन मारहाण केली. शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 26 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 91/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री सुर्यवंशी, मो.क्रं. 9527171107** हे करीत आहेत.

**3)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 05.03.2021 रोजी ते माहे डिसेंबर 2021 पर्यंत, **फिर्यादीचे सासरी पळसगाव ता. वसमत जि. हिंगोली ह.मु. शंकरनगर वसरणी, नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाईस यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करुन लग्नात हुंडा कमी दिला तुझ्या वडीलांकडुन 50,000/— रुपये आणुन दे म्हणुन उपाशी पोटी ठेवुन तीचा शारिरीक व माणसीक छळ करुन मारहाण केली. शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 19 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 304/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/1224 सुर्यवंशी, मो.क्रं. 8329712505** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :—

**कुंटूर :—** दिनांक 22.05.2022 रोजी चे 23.00 वा. चे सुमारास, **मौजे बरबडा पुर्नवसन गावाजवळ ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्रा एकुण किंमती 11,580/—रुपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोह/1708 रमेश मोहनराव निखाते, ने. पोस्टे कुंटूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 88/2022 कलम 65(ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2315 सोनकांबळे, मो.क्र. 9049117415** हे करीत आहेत.

## 9)पाण्यात बडुन मृत्यु :—

**नांदेड ग्रामीण :—**दिनांक 23.02.2022 रोजी चे 14.15 वा. सुमारास, काळेश्वर गोदावरी नदी पात्रात विष्णुपुरी ता. जि. नांदेड यातील **मयत नामे संतोष पंडीत कदम वय** 21 **वर्षे रा. वाळकी ता. लोहा जि. नांदेड** हा सैन्यात भरती झाल्याने वैदयकीय तपासणी करीता स.द. विष्णुपुरी नांदेड येथे आला वैदयकीय तपासणी करुन त्याचे मित्रासोबत काळेश्वर येथे गोदावरी नदीमध्ये पोहण्यासाठी गेला असता पाण्यात बुडुन मरण पावला. वगैरे **खबर देणार सुरेश शंकर कदम, वय 44 वर्षे, व्यवसाय शेती रा. वाळकी ता. लोहा जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** आ. मृ. **57**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/124 गवळी, मो.नं. 8208681527** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड